नि.दि.मु.क्र २२/२००८

## नि. ५ खालील आदेश :—

वादीने प्रस्तुतचा अर्ज आदेश ३९ नियम १ व २ दिवाणी प्रक्रिया संहितानुसार तूर्तातूर्त ताकीदीसाठी दिला.

२) वादीने कथन केले की, मौजे जळगांव, ता. कोरेगांव, जि. सातारा येथील जमिन मिळकती :

| | क.ग.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु. पै. | हिस्सा |
|---|---|---|---|---|
| अ) | ३७० | ०—८४ | ११—५५ | संपूर्ण |
| ब) | ५१९ | ०—३२ | ४—३० | संपूर्ण |

या संपूर्ण जमिन मिळकती त्यात असणारे झाडझुड, तदंगभूत वस्तुसह संपुर्ण गट नंबर या दाव्याचा वाद विषय आहेत.

३) यातील वादी हा प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचा भाऊ आहे व प्रतिवादी क्र. ५ व ६ चा मामा आहे. प्रतिवादी क्र. ५ व ६ हे नात्याने सख्खे बहिण भाऊ आहेत. वाद मिळकती या वादी, प्रतिवादी यांच्या वडिलार्जित मालकी हक्क कब्जे वहिवाटीच्या जमिन मिळकती आहेत. दावा मिळकती या वादी, प्रतिवादी यांच्या वडिलार्जित मिळकती आहेत व सदर मिळकतीत वादी, प्रतिवादी यांना कायदेशीर असा समाईकात अविभक्त हिस्सा आहे. सदर मिळकतींचे वादी, प्रतिवादी यांच्यात अद्यापी त्यांचे त्यांचे कायदेशीर हिश्श्याप्रमाणे सरस निरस मानाने चतु:सिमापुर्वक तुटक व पृथ:क असे वाटप झालेले नाही. वादी हा एकटाच वाद मिळकती ज्या गावी आहेत त्या गांवचा कायमचा रहिवासी आहे. सर्व वाद मिळकती या एकटया वादीचे कब्जात आहेत व वादीची एकटयाचीच सदर सर्व वाद मिळकतीत प्रत्यक्ष कब्जे वहिवाट आहे. सर्व वादी मिळकतीचे गांवचे रेकॉर्ड सदरी त्याप्रमाणे वादीचे नावाची कब्जेदार सदरी व वहिवाट सदरी नोंद आहे.

४) वादीने पुढे कथन केले की, वादीस कुणीही मुलबाळ नाही. वादी हा वयस्कर असलेने त्यास शेतातील काम होत नाी. कुटूंबाचे गरजेसाठी त्यास शेजमिन विकणेशिवाय पर्याय नाही. वादीस सर्व जमिन विकता येवू नये म्हणून प्रतिवादीने कटकारस्थान रचुन वादीची दिशाभुल करुन रजिस्टर वाअपाचा पेकळ दस्त अस्तित्वात आणला. वस्तुत: वाद मिहकतीचा सरस निरस मानाने वाटप करणेचा व त्याबाबतचा रजिस्टर दस्त नोंदविणेचा वादीचा कधीही हेतू नव्हता. प्रतिवादी क्र. ५ याने दस्त लेखनिकाकडून पोकळ वाटपाचा दस्त तयार केला. तो प्रतिवादींची त्यांचे कायदेशीर हिश्श्याप्रमाणे नावे लावण्यासाठी तयार केला अशी वादीची समजुत झालेने वादीने दस्त नोंदविणेस संमती दिली. त्यामुळे सदरचे वाटपपत्र हे पोकळ व बेकायदेशीर आहे. प्रतिवादींनी ता. २६/१२/२००७ रोजीचे पोकळ दस्त आधारे त्यांची नावे वाद मिळकतीचे ७ x १२ स लावणेसाठी तलाठी यांचेकडे अर्ज केला व त्याचे तबदिल करणेसाठी गिऱ्हाईक शोधणेस सुरुवात केली. त्यामुळे वादीच्या हिश्श्यास बाधा पोहोचणार यावरुन त्याने दावा मिळकत तबदिल न करणेसाठी तूर्तातूर्त ताकीदीची मागणी केली.

५) प्रतिवादी क्र. १ व २ यांनी तूर्तातूर्त ताकीदीस म्हणणे दाखल केले नाही. परंतु त्यांनी दाव्याची कैफियत दाखल केली व त्यांनी वादीचा दावा मान्य केला.

६) प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांनी नि.क्र. २५ वर तूर्तातूर्त ताकीदीस म्हणणे दाखल केले. त्यांनी कथन केले की, वादी व प्रतिवादी यांचे मुळ पुरुष कृष्णराव हे सन १९७५ साली मयत झालेनंतर त्यांचे पश्चात वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांची व प्रतिवादी क्र. ५ व ६ यांची आई शेवंता शंकर सावंत यांची रेकॉर्डसदरची फेरफार क्र. ६३३ ने नोंद झाली आहे. शेवंता शंकर सावंत हिचे मृत्यूनंतर तिचा मुलगा प्रतिवादी क्र. ५ ची फेरफार क्र. ५६३ ने रेकॉर्डसदरची नोंद झाली. वादीने प्रस्तुत दाव्यात नोंदणीकृत वाटपपत्रास आव्हान दिलेले नाही व

दस्त रद्द करुन मागितलेला नाही. याउलट नोंदणीकृत वाटपाआधारे उभयतात वाटपपत्र झाले. सदर मिळकतीस वादीच्या नावाची नोंद ए.कु.मॅ. म्हणुन झाली होती. सदर मिळकतीत वादी प्रतिवादी यांचा कायदेशीर हिस्सा होता. जमिनीचा कब्जा व वहिवाट पूर्वीपासून अलग व तुटक केली आहे. सदर जमिनीची वहिवाट प्रतिवादी जावून येवून पहात आहे. त्यानुसार दावा मिळकतीस प्रतिवादीच्या नावाची नोंद करणेसाठी वादी व प्रतिवादी यांनी एकविचाराने नोंदणीकृत वाटपपत्र केले. वादीने सदर दाव्यास अन्य मिळकती समाविष्ट केलेल्या नाहीत. वादीने गट नं. ७२५ ही दिनांक १८/०५/२००७ ला हिंदूराव जाधव यांचे पत्नीस विकली आहे व या मिळकतीचे विक्रीचे पैसे वादीच्या नावावर स्टेट बॅक ऑफ इंडीया, शाखा कोरेगांव येथे मुदतठेवीमध्ये गुंतविले आहे. म्हणजेच वादी स्वत: एकत्र कुटुंबाच्या मिळकतीची विक्री करीत आहे. पुढे जावून या रकमेतही प्रतिवादी हिस्सा मागतील या भितीने वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केला. यावरुन त्याने तूर्तातूर्त ताकीदीचा अर्ज फेटाळणेची विनंती केली.

७) पुढील मुद्दे विचारात उपस्थित होत असुन त्यावर माझे मत व कारणमिमांसा खालीलप्रमाणे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादीने सकृतदर्शनी बाजु सिध्द केली काय ? | नाही. |
| २) | न्यायाचा तराजु वादीचे बाजुने आहे काय ? | नाही. |
| ३) | ताकीद न दिल्यास वादीचे न भरुन येणारे नुकसान होईल काय ? | नाही. |
| ४) | आदेश काय ? | तूर्तातूर्त ताकीद अर्ज नामंजूर केला. |

## कारणमिमांसा

८) वादीचा अर्ज व प्रतिवादीचे म्हणणे पडताळले. उभयतांनी दाखल केलेले कागदपत्र पडताळले. युक्तीवाद ऐकला.

<u>मुद्दा क्र. १ ते ३ करीता</u> :–

९) वादी प्रतिवादी यांचेमध्ये नातेसंबंध मान्य आहेत. कारणापुरती त्यांची वंशावळ खालीलप्रमाणे.

कृष्णराव
(मुळ पुरुष)
मयत सन १९७५
पत्नी – अनुसया मयत

भिमराव (वादी)
सरुबाई (प्र.वादी १)
आनंदीबाई (प्र.वादी २)
सुमन (प्र.वादी ३)
पार्वती (प्र.वादी ४)
शेवंता मयत

पोपट (प्र.वादी१)
सिंधु (प्र.वादी२)

१०) दावा मिळकती वादी व प्रतिवादी यांच्या वडिलार्जित मिळकती आहेत. वादी हा प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचा भाऊ आहे. वादीची बहिण शेवंता ही मयत झालेनंतर तिचे वारस मुले प्रतिवादी क्र. ५ व ६ आहेत. प्रतिवादी क्र. ५ व ६ सख्खे भाऊ बहिण आहेत. वादी व प्रतिवादी यांचा दावा मिळकतीमध्ये हक्कसंबंध आहे व कायदेशीर हिस्सा आहे. वादीच्या कथनानुसार दावा मिळकीचे सरस निरस वाटप झालेले नाही व ता. २६/१२/२००७ रोजीचे नोंदणीकृत वाटप पोकळ आहे. ही बाब प्रतिवादीने फेटाळली. त्यांनी कथन केले की, वादीने मिळकत गट नं. ७२५ हे दिनांक १८/०५/२००७ ला विक्री केली. या मिळकतीच्या विक्रीचे पैसे वादीच्या नावावर बॅंकेत मुदतठेवीमध्ये गुंतविले आहेत. याबाबतीत वादीने प्रतिवादींना अंधारात ठेवून ऐन वाटपावेळी याची माहिती दिली. त्यावेळी वादी व प्रतिवादीच्या नातेसंबंधाचा विचार करुन प्रतिवादींनी या मिळकतीचा व विक्री रकमेचा प्रश्न बाजुला ठेवून वाटपपत्र केले.

११) सदरचे वाटपपत्र हे नोंदणीकृत वाटपपत्र आहे व ते नि. ३ खाली

दाखल केले आहे. त्यास पडताळले असता वादी प्रतिवादीमध्ये दावा मिळकतीचे नोंदणीकृत वाटपानुसार प्रत्येकास हिस्सा देण्यात आला आणि वाटपाप्रमाणे प्रत्येकास त्यांचे कब्जात वहिवाटीस जमिन प्रत्यक्ष दिली. सदर वाटपपत्रास वादी प्रतिवादी यांच्या स्वाक्षरी/अंगठे आहेत. त्यामुळे नोंदणीकृत वाटपपत्रावरुन वादी प्रतिवादीमध्ये दावा मिळकतीचे वाटप झाले त्यानुसार त्यांना वहिवाटी देण्यात आल्या. जर वादीच्या कथनानुसार त्यांच्यामध्ये वाटप झाले नव्हते तर त्याने ता. १८/०५/२००७ ला मिळकत गट नं. ७२५ विक्री करण्यास कारण नव्हते. तसेच सदर मिळकतीची रक्कम स्वत:च्या नावे स्टेट बॅकेत मुदतठेवीमध्ये गुंतविले आहेत. यावरुन वादीचा प्रस्तुत अर्जामागचा उद्देश स्पष्ट होतो. त्यामुळे नोंदणीकृत वाटपपत्राआधारे झालेल्या वादी प्रतिवादीच्या हिश्श्यास तूर्तातूर्त ताकीद अर्जाद्वारे प्रतिवादींनी दावा मिळकती तबदील करु नये अशा आदेशास वादी हक्कदार नाही. यावरुन मुद्दा क्र. १ ते ३ यास नकारार्थी निष्कर्ष दिला व खालीलप्रमाणे आदेश पारित केला.

## आदेश

१) नि. ५ वरील तूर्तातूर्त ताकीदीचा अर्ज नामंजूर करणेत येत आहे.

२) या अर्जाचा खर्च दाव्याच्या वेळी.

कोरेगांव
दिनांक : १८/०८/२००९.

(कृ.गं.पालदेवार)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कोरेगांव